| | | |
|---|---|---|
| दाखल दिनांक | : | २६.१२.२०२५. |
| नोंदणी दिनांक | : | २६.१२.२०२५. |
| निकाल दिनांक | : | १६.०३.२०२६. |
| कालावधी | : | वर्ष महिने दिवस<br>०० ०२ २५ |

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, न्यायालय क्र.१, कुरुंदवाड, जि. कोल्हापूर यांचे न्यायालयात.**
**(पिठासीन अधिकारी – श्री. बाळासाहेब श्री. गायकवाड)**

**प्रपत्र क्र.३२ भाग 'अ'**
**[ फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४ (i) ]**

| | | |
|---|---|---|
| **MHKO180008952025** | (जाहीर दिनांक – १६.०३.२०२६)<br>**नियमित फौजदारी खटला क्र.७९/२०२५.**<br>CNR No. MHKO18-000895-2025.<br>**निशाणी क्र.१५.** | |
| **गुन्ह्याचा तपशिल** | पोलीस ठाणे, कुरुंदवाड, गुन्हा क्र.२४३/२०२५,<br>भारतीय न्याय संहिताचे कलम ३०३(२) सह कलम ३(५). | |
| **अभियोगपक्ष** | **महाराष्ट्र शासन तर्फे**<br>सहाय्यक पोलीस निरीक्षक, पोलीस ठाणे, कुरुंदवाड. | |
| **अभियोगपक्षातर्फे** | **श्री. सं.सि.नदाफ, विद्यमान सहा. सरकारी अभियोक्ता** | |
| **आरोपी** | १. | **अदित्य सुकूमार सिदनाळे,**<br>वय : ३८ वर्षे, व्यवसाय : वाहन चालक. |
| | २. | **जयवर्धन उर्फ सर्जेराव रविंद्र कांबळे,**<br>वय : ३३ वर्षे, व्यवसाय : मजूरी,<br>दोन्ही आरोपी रा. : शिरदवाड, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर. |
| **आरोपींतर्फे** | **श्रीमती श.प्र.पाटील, विद्यमान वकील.** | |

**प्रपत्र क्र.३२ भाग 'ब'**
**[ फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४ (ii) ]**

| **गुन्ह्याचा तपशिल** | | |
|---|---|---|
| गुन्ह्याची तारीख | : | दिनांक १९.०६.२०२५ रोजीचे २१.०० ते दिनांक २०.०६.२०२५ रोजीचे ०६.०० वाजताचे दरम्यान |
| प्रथम खबरी अहवाल तारीख | : | २०.०६.२०२५ |

| | | |
|---|---|---|
| दोषारोपपत्र दाखल तारीख | : | २६.१२.२०२५ |
| दोषारोप निश्चित तारीख | : | १६.०३.२०२६ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | : | १६.०३.२०२६ |
| न्यायनिर्णय राखीव ठेवल्याची तारीख | : | -- |
| न्यायनिर्णयाची तारीख | : | १६.०३.२०२६ |
| शिक्षेच्या आदेशाची तारीख, जर असेल तर | : | -- |

**आरोपीचा तपशिल**

| आरोपी क्र. | आरोपींचे नाव | अटक तारीख | जामीन तारीख | दोषारोप ठेवलेले अपराध | निर्दोष सोडले किंवा शिक्षा दिली | शिक्षेचे स्वरुप | फौ.प्र.सं.कलम ४२८ करीता संपरिक्षे दरम्यान जेलमध्ये असल्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | अदित्य सुकूमार सिदनाळे | - | १६.०३.२०२६ | भारतीय न्याय संहिताचे कलम ३०३(२) सह कलम ३(५). | निर्दोष | — | — |
| २. | जयवर्धन उर्फ सर्जेराव रविंद्र कांबळे | - | १६.०३.२०२६ | | निर्दोष | — | — |

**प्रपत्र क्र.३२ भाग 'क'**
**[ फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४ (iii) ]**
**सरकारी/बचाव/न्यायालयीन साक्षीदारांची यादी**

**अ. सरकारी**

| क्रमांक | नाव | पुराव्याचे स्वरुप | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| १. | कुलभुषण सुरेंद्र हजारे | तक्रारदार | १३ |

**ब. बचावाचे साक्षीदार**

| क्रमांक | नाव | पुराव्याचे स्वरुप | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| नाही | | | |

**क. न्यायालयीन साक्षीदार**

| क्रमांक | नाव | पुराव्याचे स्वरुप | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| नाही | | | |

## सरकारी/बचाव/न्यायालयीन कागदोपत्री निशाणांची यादी

### अ. सरकारी

| क्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | १४. | तक्रारदार यांनी जप्त एक म्हैस त्यांना परत मिळाल्याबाबत दाखल केलेली पुरसीस. |

### ब. बचाव

| क्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| नाही | | |

### क. न्यायालयीन निशाण्या

| क्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| नाही | | |

### मुद्देमाल

| क्रमांक | मुद्देमाल वस्तू क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | १ | मु–हा जातीची एक म्हैस. |

## न्या य नि र्ण य

(अधिघोषित दिनांक १६.०३.२०२६)

प्रस्तुत खटल्याद्वारे आरोपींची भारतीय न्याय संहिताचे कलम ३०३(२) सह कलम ३(५) या आरोपाखाली संपरीक्षा घेण्यात आली.

**अभियोगपक्षाचे थोडक्यात कथन :–**

०२. दिनांक १९.०६.२०२५ रोजीचे रात्री ०९.०० ते दिनांक २०.०६.२०२५ रोजीचे सकाळी ०६.०० वाजताचे दरम्यान मौजे शिरदवाड येथील तक्रारदार यांच्या गट क्र.८९० मधील शेतातील गोठयातून मु–हा जातीची एक म्हैस अज्ञात आरोपीने चोरुन नेली होती. सदर घटनेबाबत तक्रारदार यांनी दाखल केलेल्या तक्रारीवरुन पोलीस ठाणे, कुरुंदवाड येथे अज्ञात आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिताचे कलम ३०३(२) या आरोपाखाली गु.र.क्र.२४३/२०२५ नोंदविण्यात आला व पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक सागर बजरंग पवार यांच्याकडे सोपविण्यात आला. तपासीक अंमलदार यांनी गुन्ह्याच्या तपासाअंती आरोपींविरुध्द भारतीय

न्याय संहिताचे कलम ३०३(२) सह कलम ३(५) या आरोपाखाली न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

०३. दिनांक १६.०३.२०२६ रोजी आरोपींविरुध्द भारतीय न्याय संहिताचे कलम ३०३(२) सह कलम ३(५) या आरोपाखाली निशाणी क्र.१० वर दोषारोप निश्चित करण्यात आले. आरोपींविरुध्द निश्चित करण्यात आलेला दोषारोप आरोपींना त्यांच्या भाषेत वाचुन व समजावुन सांगितला असता आरोपींनी सदर दोषारोप नाकारला व संपरीक्षेला सामोरे जाण्याची तयारी दर्शविली.

०४. अभिलेखावरील पुराव्यावरुन आणि दोन्ही पक्षांच्या युक्तिवादावरुन न्यायनिर्णयासाठी उपस्थित झालेले मुद्दे कारण मिमांसासहित खालीलप्रमाणे :–

| मुद्दे | निष्कर्ष |
| --- | --- |
| १. आरोपींनी घटनेवेळी आपसात संगनमत करून तक्रारदार यांच्या म्हैशीची चोरी केली, ही बाब अभियोगपक्षाने सिध्द केली आहे काय ? | ...नाही. |
| २. आदेश काय ? | ...आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात येते. |

०५. आरोपींविरुध्दचा गुन्हा सिध्द करण्याकरीता अभियोगपक्षाने तक्रारदार यांची एकमेव साक्ष निशाणी क्र.१३ वर नोंदविली आहे. तक्रारदार यांनी अभियोगपक्षास पुराव्याकमी सहकार्य केले नसल्यामुळे आणि आरोपींसोबत प्रस्तुत प्रकरणात न्यायालयाबाहेर तडजोड झाल्याचे कथन केल्यामुळे निशाणी क्र.०१ वरील आदेशान्वये अभियोगपक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. आरोपींना गुन्ह्यात गोवण्याईतपत कोणताही साक्षीपुरावा अभियोगपक्षाने अभिलेखावर आणला नाही. सबब, आरोपींचे भारतीय नागरीक सुरक्षा संहिताचे कलम ३८१ प्रमाणे निवेदन नोंदविण्यात आले नाही.

०६. अभियोगपक्षातर्फे विद्यमान सहाय्यक सरकारी वकील श्री. सं.सि.नदाफ व आरोपींतर्फे विद्यमान वकील श्रीमती श.प्र.पाटील यांचा युक्तीवाद ऐकण्यात आला.

:: कारणमिमांसा ::

मुद्दा क्र.१ करीता :–

०७. तक्रारदार यांनी दिनांक १९.०६.२०२५ रोजीचे रात्री ०९.०० ते दिनांक २०.०६.२०२५ रोजीचे सकाळी ०६.०० वाजताचे दरम्यान त्यांना त्यांची एक म्हैस दिसून आली नसल्यामुळे त्यांनी गैरसमजूतीतून अज्ञात चोरटयाविरुध्द पोलीस ठाण्यामध्ये तक्रार दाखल केल्याचे कथन केले आहे. तक्रारीवरील सही त्यांची असली तरी त्यातील मजकुराविषयी त्यांना काहीही माहिती नसल्याचे त्यांनी कथन केले आहे. तक्रारदार हे अभियोगपक्षास पुराव्याकामी सहकार्य करीत नसल्यामुळे अभियोगपक्षाने न्यायालयाच्या परवानगीने त्यांना उत्तरसुचक प्रश्न विचारले. परंतु, अभियोगपक्षास तक्रारदार यांच्या साक्षीपुराव्यातून तोंडी तक्रार सिध्द करता आली नाही. याउलट, तक्रारदार यांनी आरोपींसोबत त्यांची न्यायालयाबाहेर तडजोड झाल्याचे कथन केले आहे. अभियोगपक्षाने तक्रारदार यांच्या व्यतिरीक्त अन्य कोणत्याही साक्षीदाराची साक्ष अभिलेखावर नोंदविली नाही.

०८. वरील विवेचनावरुन असे दिसुन येते की, तक्रारदार यांनी अभियोगपक्षास पुराव्याकामी सहकार्य केले नसल्यामुळे आणि उर्वरीत साक्षीदार यांच्या साक्षीपुराव्याअभावी अभियोगपक्षास आरोपींविरुध्दचा गुन्हा संशयापलीकडे सिध्द करण्याकरीता कोणताही प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष तसेच सुसंगत असा सबळ पुरावा अभिलेखावर आणता आला नाही. सबब, अभियोगपक्षास आरोपींविरुध्द ठेवण्यात आलेल्या अपराधाची मुलतत्वे संशयापलीकडे सिध्द करता आली नाहीत. त्यामुळे, मुद्दा क्र.१ चे उत्तर मी नकारार्थी देत आहे.

मुद्दा क्र.२ करीता :–

०९. अभियोगपक्षाचा एकुण साक्षीपुरावा आहे असा जरी वाचला तरी त्यावरुन आरोपींविरुध्द कोणताही गुन्हा संशयापलीकडे सिध्द होत नाही. त्यामुळे, आरोपींना संशयाचा फायदा देवून त्यांची प्रस्तुत गुन्ह्यातुन निर्दोष मुक्तता करणे न्यायोचीत होईल. जप्त मुद्देमालातील मु–हा जातीची एक म्हैस परत मिळाल्याबाबत तक्रारदार यांनी निशाणी क्र.१४ वर पुरसीस दाखल केली आहे. सबब, मुद्दा क्र.२ करीता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

## :: आ दे श ::

१. आरोपी क्र.१ अदित्य सुकूमार सिदनाळे व आरोपी क्र.२ जयवर्धन उर्फ सर्जेराव रविंद्र कांबळे यांची भारतीय न्याय संहिताचे कलम ३०३(२) सह कलम ३(५) या गुन्ह्यातुन भारतीय नागरीक सुरक्षा संहिताचे कलम २७१(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपींचे जामीन कद्बे रद्द करण्यात येत आहेत.

३. आरोपींनी भारतीय नागरीक सुरक्षा संहिताचे कलम ४८१ च्या पुर्ततेसाठी सहा महिने कालावधीकरीता प्रत्येकी रक्कम रुपये १५,०००/- किंमतीचे वैयक्तीक व तितक्याच रकमेचे प्रत्येकी एका जामीनदाराचे बंधपत्र द्यावे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात निवेदित व अधिघोषीत करण्यात आला.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by BALASAHEB SHRIPATRAO GAIKWAD
Date: 2026.03.16 17:57:51 +0530

दिनांक : १६.०३.२०२६.
कुरुंदवाड.

(बाळासाहेब श्री. गायकवाड)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
न्यायालय क्र.१, कुरुंदवाड.